महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०१ वा | दिनांक : ३१/०५/२०२५ | वार : शनिवार

# फरार आरोपी नीलेश चव्हाणला अखेर बेड्या





**पुणे :** वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात प्रमुख आरोपींमध्ये समावेश असल्याचा आरोप केला जाणारा नीलेश चव्हाण याला पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. नीलेश गेल्या काही दिवसांपासून फरार होता. मात्र आता त्याला नेपाळमधून पोलिसांनी अटक केली आहे. नीलेश चव्हाण याच्यावर बाळाची हेळसांड केल्याचा तसेच कस्पटे कुटुंबावर बंदूक रोखण्याचा देखील आरोप आहे. नीलेश चव्हाण याच्या अटकेनंतर आता या प्रकरणात अनेक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाशी संबंधित प्रकरणात पीडित कस्पटे कुटुंबीयांना धमकावल्या प्रकरणी नीलेश चव्हाण या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तरुणावर वैष्णवीचे बाळ घेण्यासाठी गेलेल्या वैष्णवीच्या कुटुंबीयांना धमकावल्याचा आरोप आहे. तसेच त्याने त्याच्या पत्नीचा अमानुष छळ व तिचे आक्षेपार्ह व्हिडिओ तयार केल्याची संतापजनक बाब उजेडात आली आहे. या प्रकरणी गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. त्याला आता नेपाळमधून अटक करण्यात आली आहे. त्याला आज रात्रीपर्यंत पुण्यात आणले जाणार आहे.

नीलेश चव्हाण हा वैष्णवी हगवणेचे पती शशांक हगवणे आणि बहिण करिष्मा हगवणे यांचा मित्र आहे. त्याची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची आहे. त्याच्यावर त्याच्या पत्नीचा अमानुष छळ केल्याचा ठपका आहे. तो स्पाय कॅमेऱ्याच्या मदतीने आपल्या पत्नीचे आक्षेपार्ह व्हिडिओ चित्रित करायचा. या प्रकरणी त्याच्यावर २०१९ मध्ये पुण्यातील वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता याच ठाण्यात नीलेश चव्हाणवर वैष्णवी हगवणेचे बाळ मागण्यासाठी गेलेल्या तिच्या माहेरच्यांना पिस्तुल दाखवून धमकावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, नीलेश चव्हाणचे लग्न ३ जून २०१८ रोजी झाले. त्यानंतर जानेवारी २०१९ मध्ये त्याच्या पत्नीला आपल्या बेडरूममधील सीलिंग फॅनला काहीतरी संशयास्पद वस्तू अडकवण्यात आल्याचा संशय आला. तिने याविषयी नीलेशला विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पुढच्या फेब्रुवारी महिन्यात त्याच्या पत्नीला घरातील एसीलाही काहीतरी संशयास्पद वस्तू अडकवण्यात आल्याची बाब निदर्शनास आली. यावेळी तिचा संशय अधिकच बळावला. त्यानंतर तिने आपल्या पतीला म्हणजे नीलेश चव्हाणला त्याचा जाब विचारला.

त्यावर नीलेशने पुन्हा उडवाउडवीची उत्तरे दिली. अखेर त्याच्या पत्नीने त्याचा लॅपटॉप उघडून पाहिला असता त्यात त्यांच्या शरीर संबंधांचे व्हिडिओ स्पाय कॅमेऱ्याने रेकॉर्ड केल्याचे तिला आढळले. एवढेच नव्हे तर नीलेशचे इतर मुलींसोबतचे आक्षेपार्ह स्थितीतील व्हिडिओही तिच्या निदर्शनास आले. तिने या प्रकरणी नीलेशकडे विचारणा केली असता त्याने घरातील चाकू दाखवून तिला धमकावले. तिचा गळा दाबला. एवढेच नाही तर तिच्याशी बळजबरीने शारिरीक संबंध ठेवले.

नीलेशच्या पत्नीने या प्रकाराची माहिती त्याच्या आई-वडिलांना व घरातील इतर सदस्यांना दिली. त्यानंतर त्यांच्याकडूनही तिचा छळ सुरु झाला. त्यानंतर पुढील अनेक महिने नीलेशने पीडित महिलेचा म्हणजे आपल्या पत्नीचा अतोनात छळ केला. त्यामुळे तिने आपले घर सोडण्याचा निर्णय दिला. त्यानंतर १४ जून २०२२ रोजी तिच्या तक्रारीनुसार नीलेश व त्याच्या कुटुंबीयांवर कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. उल्लेखनीय बाब म्हणजे त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज कोर्टाने फेटाळण्यात आल्यानंतरही वारजे पोलिसांनी त्याला अटक केली नाही. अखेर मुंबई उच्च न्यायालयाने त्याला अटकपूर्व जामीन मंजूर केला.

नीलेश चव्हाण हा बांधकाम व्यावसायिक आहे. त्याचा पोकलेन मशीनचाही व्यवसाय आहे. नीलेश चव्हाण हा मयत वैष्णवी हगवणेचा पती शशांक हगवणे याची बहीण करिश्मा हगवणेचा मित्र आहे. शशांक व वैष्णवी यांच्यातील वादात अनेकदा त्याने हस्तक्षेप केल्याचीही माहिती आहे. कर्वेनगर भागातील औदूंबर पार्क सोसायटीत नीलेशच्या वडिलांचे ३ फ्लॅट आहेत.

## धनंजय मुंडे यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी होणार



**मुंबई :** माजी मंत्री धनंजय मुंडे यांची सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसमधून लवकरच हकालपट्टी होईल, असा मोठा दावा त्यांच्या पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या करुणा शर्मा मुंडे यांनी केला आहे. धनंजय मुंडे हे महाराष्ट्रातील सर्वात मोठा गुंड असल्याचेही त्या यावेळी म्हणाल्यात.

करुणा शर्मा मुंडे शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी निवडलेला ध्यानधारणेचा मार्ग चांगला आहे. त्यांचे मंत्रिपद गेले आहे. आता त्यांची आमदारकीही जाणार आहे. एवढेच नव्हे तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुंड लोकांची पक्षातून हकालपट्टी करण्याचे सूतोवाच केले आहे. त्यानुसार ते तशी पाऊलेही उचलत आहेत. त्यामुळे ते धनंजय मुंडे यांचीही लवकरात लवकर हकालपट्टी करतील असे मला वाटते. कारण, महाराष्ट्रात सर्वात मोठा गुंडा कुणी असेल तर तो केवळ धनंजय मुंडे आहे.

पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांनी विपश्यनेचा योग्य मार्ग निवडल्याची प्रतिक्रिया दिली आहे. करुणा शर्मा यावर बोलताना म्हणाल्या की, पंकजा मुंडे यांना आता मंत्रिपद मिळाले आहे. त्यांना आता धनंजय मुंडे यांची गरज राहिली नाही. धनंजय मुंडे यांनीच त्यांना मंत्रिपद मिळवून दिले. आता त्यांचे काम आता झाले आहे. त्यामुळे त्यांनी असे विधान केले असेल. आता त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांना परळीवर वर्चस्व निर्माण करायचे आहे. मी २००९ पासून मी त्यांच्यातील वाद पाहत आहे. त्यामुळे त्यांनाही कुठे ना कुठे तरी यांनी संन्यास घ्यावा असे वाटत होते, असे त्या म्हणाल्या.

## दौंड-इंदोर एक्सप्रेसला अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या : खासदार बजरंग सोनवणे

**बीड :** दौंड-इंदोर एक्सप्रेस गाडीला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, तसेच या गाडीचा विस्तार अहिल्यानगर (अहमदनगर) पर्यंत करावा, अशी मागणी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी अतुलनिय आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली ठरावी आणि या भागातील प्रवाशांना अधिक सोयीचा रेल्वेमार्ग उपलब्ध व्हावा, हा यामागचा उद्देश आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दौंड-इंदोर या रेल्वेगाडीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस असे नाव देण्यात यावे, अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्रासह मध्यप्रदेशसह अनेक राज्यात महत्वपूर्ण आहे. सदरील गाडीला अहिल्यादेवी यांचे नाव दिल्यास सदरील रेल्वेला नवी ओळख मिळेल.

सदरील गाडी आता इंदोर ते दौंड अशी चालत आहे. सदरील गाडीचा विस्तार करून अहिल्यानगरपर्यंत करणे आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठवाड्यातील यात्रेकरू भाविकांना याचा लाभ होईल. पुण्यश्लोक आहिल्सादेवींचे जन्मस्थान आहिल्यानगर जिल्ह्यात आहे. मराठवाड्यातील नागरिकांना थेट इंदोरला जाणे सोपे होईल. सदरील सेवा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जन्म जयंती ३१ मे रोजी येत असल्याने ३० मे २०२५ पासूनच सुरू करावी, यामुळे जन्मदिनानिमीत्त हा सन्मान ठरेल, असेही पत्रात म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ मे २०२५


## वैष्णवी हगवणे प्रकरणातील कोणालाही सोडले जाणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पुण्यात होते. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील नीलेश चव्हाण याला नेपाळच्या बॉर्डरवरून ताब्यात घेण्यात आले आहे. यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात जेवढे कोणी लोक असतील कोणालाही सोडले जाणार नाही.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पोलिसांनी अतिशय चांगली कारवाई केली आहे. नेपाळला पळून जाण्याची तयारी होती परंतु पोलिसांनी बॉर्डरवरच त्याला अटक केली आहे. योग्य प्रकारचे इंटेलिजेंस प्राप्त करून हा सगळा ट्रॅप पोलिसांनी तयार केला. त्यामुळे आता त्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे. मी पहिल्याच दिवशी सांगितले होते की या प्रकरणात जेवढे कोणी लोक असतील कोणालाही सोडले जाणार नाही, कुठलीही हयगय केली जाणार नाही आणि अतिशय कडक अशी शिक्षा झालीच पाहिजे हा प्रयत्न आमचा असणार आहे.

लाडकी बहीण योजनेवर बोलताना फडणवीस म्हणाले, लाडकी बहीण योजनेच्या निकषात नसलेल्या काही लोकांनी अर्ज करून त्या काळात याचा लाभ घेतला आहे हे माहीत असल्यामुळेच आम्ही सातत्याने या संदर्भात चौकशी करत आहोत. आम्हाला जे कोणी लोक असे आढळून येत आहेत आम्ही त्यांना कमी करत आहोत. अजून याचा तपास पूर्ण झालेला नाही. त्यानंतर तुम्हाला सगळी माहिती देऊ.

आयजी जालिंदर सुपेकर यांच्या संदर्भात प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची तक्रार आलेली आहे. त्या तक्रारीत किती तथ्य आहे हे पाहण्यासाठी मी सांगितले आहे. आणि दुसरे कुठल्याही प्रकारे कोणीही या तपासात दबाव आणू नये किंवा या तपासात गडबड करू नये या दृष्टीने आम्ही काही निर्णय घेतले आहेत.

## अजित पवार गोचिडासारखे अर्थ खात्याला चिटकले आहेत - लक्ष्मण हाकेंचा हल्लाबोल



**पुणे : :** अजित पवार गोचिडासारखे अर्थ खात्याला चिटकले आहेत, अशी टीका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अमोल मिटकरी हा फडतूस असल्याचेही हाके यांनी म्हटले आहे. मी जर बोललो तर मिटकरी आणि त्यांचा आका अजित पवार यांच्या अंगावर कपडे राहणार नाहीत, अशा शब्दात लक्ष्मण हाके यांनी टीका केली आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले, गेल्या 20 वर्षापासून अर्थ खात्याला चिटकून बसलेल्या अजित दादांनी अर्थ खात्यात पीएचडी केलीय का? ते तर साधे कोंबडीच्या पोल्ट्री फार्म वाले आहेत. त्यांचे राजकारण सत्तेसाठी पैसा आणि पैशासाठी सत्ता असे आहे. ते सामाजिकदृष्ट्या असंवेदनशील आहेत. यांनी भटके विमुक्त आणि मागास महामंडळाला 50 पैसे सुद्धा त्यांनी दिले नाहीत. ज्या आण्णासाहेब पाटील महामंडळाला हजारो कोटी रुपयांचा निधी दिली जातो. पण ओबीसींच्या महामंडळाता दोन पाच कोटी अजित पवार देऊ शकत नाहीत. अजित पवार हे पोल्ट्री चालवणारा माणूस, काकांच्या जीवावर ते पुढे आले, अशी सडकून टीका केली आहे.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मुळात सगळे सरकारमध्येच आहेत. महाराष्ट्राला विरोधकच उरला नाही. कॉंग्रेसमधीलही काही माणसे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. शरद पवार, रोहित पवार, सुप्रिया सुळे हे सगळे भाजपमध्ये सामील झाले आहेत असे हाके म्हणाले. दुर्दैव हे आहे की सामान्य माणूस आवाज उठवू शकत नाही त्याचे मरण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आमच्या खूप अपेक्षा आहेत, असेही लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.

लक्ष्मण हाके यांना समाजाने फॉर्च्यूनर गाडी भेट दिली आहे. यावरून अमोल मिटकरी यांनी त्यांच्यावर टीका केली होती. त्यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना लक्ष्मण हाके म्हणाले, गाडी हे माझे साधन आहे, साध्य नाही. कोणाला टीका करायची ती करू द्या. अमोल मिटकरी बाजारू विचारवंत आहे. मिटकरी अजित पवारांच्या घरी झाडू मारतात, त्याबद्दल त्यांना आमदारकी दिली. आम्ही जर मिटकरीला त्याच भाषेत उत्तर दिले तर त्याचेही कपडे राहणार नाहीत आणि अजित पवारांचे देखील कपडे राहणार नाहीत, अशी टीका केली आहे.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मिटकरी तू विधानपरिषदेचा सदस्य आहे. ओबीसीवर कधी बोलला का? अजित पवारांनी ओबीसीसाठी एकदा तरी वसतिगृह दिले का? असा सवाल हाके यांनी उपस्थित केला. तसेच अजित पवारांचे खासगी कारखाने अगणित आहेत, अशीही टीका हाके यांनी अजित पवारांवर केली आहे.

## धुळयातील तरुणाकडून १.६९ लाखांचा गांजा जप्त

**पुणे :** वाघोली पोलिसांनी गांजा विक्री करणाऱ्या एका तरुणाला अटक केली. वाघोली-लोहगाव रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. आरोपीकडून पोलिसांनी आठ किलो ४०२ ग्रॅम गांजा जप्त केला.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील हिसाळे येथील सुरेश साहेबराव पाटील (४४) याला पोलिसांनी अटक केली. वाघोली-लोहगाव रस्त्यावर गस्त घालणाऱ्या पोलिसांना पाटील गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले. त्याच्याकडील पिशवीतून गांजा सापडला. जप्त केलेल्या गांजाची किंमत एक लाख ६९ हजार ३४० रुपये आहे.

न्यायालयाने पाटील याला २ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पाटील गांजा कोणाला विकणार होता आणि त्याने तो कोणाकडून आणला याचा तपास सुरू आहे.

अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त हिंमत जाधव आणि सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

तरूणाला बेदम मारहाण करून ऑनलाईन रक्कम वर्ग करून घेतली,पाचजणांविरूद्ध गुन्हा दाखल

तरूणाला बेदम मारहाण करीत त्यांच्याकडील फोनद्वारे ८५ हजार रूपये ऑनलाईन वर्ग करून घेत टोळक्याने इतर साहित्याची चोरी केली आहे. ही घटना आंबेगाव बुद्रूकमधील सिंहगड कॅम्पसमधील शांताई हाईटसमध्ये घडली आहे. याप्रकरणी पाचजणांविरूद्ध भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रियंका अनिल शेळके (वय ३१, रा. वाघपूर, तासगाव सांगली) हरीराम कदम, सयाजी पाटील, विशाल जाधव, संदीप रासकर अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी सुधीर अर्जुन पाटील (वय ३४, रा. आंबेगाव बुद्रूक) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार सुधीर पाटील हे आंबेगाव बुद्रूकमधील शांताई हाईटसमध्ये राहायला आहेत. त्यांच्या ओळखीतील आरोपींनी घरात प्रवेश केला. टोळक्याने त्यांना बेदम मारहाण करीत ऑनलाईन फोनपेद्वारे तब्बल ८५ हजार रूपये वर्ग करून घेतले. त्यानंतर टोळक्याने त्यांच्या बॅंगेतील ४२ हजारांची रोकड, लॅपटॉप, इतर ऐवज मिळून १ लाख २७ हजारांची चोरी केली. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक एस परदेशी तपास करीत आहेत.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ मे २०२५

# मी चुकीचा नसेन तर माफी मागणार नाही - कमल हसन



**चेन्नई** : कन्नड भाषेवरील त्यांच्या वक्तव्यावरून सुरू असलेल्या वादात अभिनेता आणि राजकारणी कमल हसन यांनी माफी मागण्यास नकार दिला आहे. शुक्रवारी चेन्नईमध्ये 'ठग लाईफ' या चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान ते म्हणाले की, जर मी चुकीचा नसेन तर माफी मागणार नाही.

हसन म्हणाले, 'भारत हा एक लोकशाही देश आहे. माझा कायदा आणि न्यायावर विश्वास आहे. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि केरळवरील माझे प्रेम खरे आहे. प्रेम नेहमीच जिंकते. मला आधी धमक्या देण्यात आल्या आहेत, पण जर मी चूक असेन तर मी माफी मागेन, जर मी बरोबर असेन तर मी माफी मागणार नाही.'

येथे, कर्नाटक फिल्म चेंबर ऑफ कॉमर्स (KFCC) ने कमल हसन यांच्या 'ठग लाईफ' चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घातली आहे. केएफसीसीचे अध्यक्ष एम नरसिंहालू यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, जर कमल हसन यांना त्यांचा चित्रपट प्रदर्शित करायचा असेल, तर त्यांना माफी मागावी लागेल.

खरं तर, २४ मे रोजी चेन्नईमध्ये 'ठग लाईफ'च्या ऑडिओ लाँच दरम्यान कमल यांनी सांगितले होते की, कन्नड भाषेचा उगम तमिळ भाषेतून झाला आहे. या विधानानंतर, कन्नड समर्थक संघटनांनी कन्नड लोकांच्या भावना दुखावल्याबद्दल त्यांनी जाहीरपणे माफी मागावी अशी मागणी केली आहे.

चित्रपटाच्या प्रमोशनल कार्यक्रमादरम्यान, कमल यांनी कन्नड अभिनेता शिवा राजकुमार यांच्याकडे बोट दाखवत ही टिप्पणी केली होती. राजकुमार यांच्याकडे बोट दाखवत ते म्हणाले होते- 'शिव राजकुमार माझ्या कुटुंबासारखे आहेत, म्हणूनच ते इथे आहेत.' मी माझे भाषण जीवन, नातेसंबंध आणि तमिळ यापासून सुरू केले. तुमची भाषा (कन्नड) तामिळमधून आली आहे, म्हणून तुम्हीही आमचाच एक भाग आहात. कर्नाटकातील काँग्रेस सरकारचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी २८ मे रोजी कमल हसन यांनी कन्नड भाषेवरील केलेल्या वक्तव्यावर टीका केली होती. ते म्हणाले होते, 'कन्नड भाषेचा इतिहास खूप जुना आहे. बिचाऱ्या कमल हसन यांना याची जाणीव नाही.

# धनंजय मुंडे यांनी योग्य मार्ग निवडला : आता त्यांना मनःशांती मिळेल, मंत्री पंकजा मुंडे



**पुणे** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे हे मागील आठ दिवसापासून नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील प्रसिद्ध विपश्यना केंद्रात विपश्यना घेत असल्याचे समजते. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, मंत्रिपदाचा राजीनामा तसेच करुणा मुंडे अशा सगळ्या वादात धनंजय मुंडे गेले काही महीने अडकले होते. आता ते विपश्यना घेत असल्याचे समजते. यावर भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

धनंजय मुंडे विपश्यना केंद्रात दाखल झाले आहेत, यावर प्रतिक्रिया देताना पंकजा मुंडे म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी योग्य पर्याय निवडला आहे. आता मनःशांती होईल, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी दिलेल्या या प्रतिक्रियेची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याकडे असलेले खाते हे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याकडे देण्यात आले आहे.

पंकजा मुंडे यांनी वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या, वैष्णवीला न्याय मिळायला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक पाऊल उचलले पाहिजे. याबाबतचा सर्व निर्णय मुख्यमंत्री घेतील. महिला आयोगाने दखल घेणे क्रमप्राप्त आहे. कुठलीही तक्रार असू देत महिला आयोगाने ती घेतली पाहिजे आणि पोलिसांनी कारवाई करायला हवी, असे मुंडे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पंकजा मुंडे यांनी पुण्यात दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले आहे. दर्शन घेतल्यानंतर बोलताना त्या म्हणाल्या, पर्यावरण संवर्धनासाठी कार्यक्रम राबावण्याचे ठरवले आहे. प्रत्येक राज्यात कार्यक्रम राबवले जात आहेत. अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पऱ्यावरणाला महत्त्व देण्याच्या अनुषंगाने कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. दगडूशेठ मंडल या पर्यावरण उपक्रमात सहभागी झाला आहे. तसेच प्लॅस्टिकचा वापर करू नका, असे आवाहनही यावेळी पंकजा मुंडे यांनी केले आहे.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ मे २०२५

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रतिबिंबित झालेली संविधानिक मूल्ये



सन २०२५ हे वर्ष भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून देशभर साजरे केले जात आहे. त्याचबरोबर हे वर्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. भारताच्या संविधानात अनेक संत, महापुरुषांचे विचार प्रतिबिंबित झालेले आहेत.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार देखील भारताच्या संविधानात प्रतिबिंबित झाले आहे. भारताच्या संविधानात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मुलभूत मूल्ये आहेत. हीच मूल्ये अहिल्यादेवी यांच्या राज्यात अस्तित्वात होती. स्वातंत्र्यपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राज्यात सामान्य लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य होते. त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती नव्हती. सर्वांना आपल्या धर्माप्रमाणे आचरण, श्रध्दा, उपासना तसेच विचार व्यक्त करण्याचे मुक्त स्वातंत्र्य होते. भारताच्या संविधानात स्वातंत्र्य हे मुलभूत मूल्ये असून ते प्रत्येक नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. समताअहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रियांची फौज निर्माण केली होती. स्त्रिया फक्त चूल आणि मुलच सांभाळत नाहीत तर त्या युद्धात पुरुषांप्रमाणेच शौर्य दाखवतात, असा त्यांना विश्वास होता. म्हणून, त्यांनी स्त्रियांची सुसज्ज शस्त्रांसह फौज निर्माण केली. यामधून त्यांचा स्त्री-पुरुष समानतेचा विचार दिसून येतो. हाच विचार भारताच्या संविधानात प्रतिबिंबित झाला आहे. त्या काळात विधवा स्त्रियांना जर अपत्य नसेल तर त्यांना आयुष्य जगणे अवघड होत असे. नातेवाईक व इतर मंडळी त्या विधवेच्या संपत्तीवर डोळा ठेवून असत. त्यामुळे, विधवा स्त्रीला शोषण, अत्याचार यांना सामोरे जावे लागत असे. अहिल्यादेवी यांनी विधवा स्त्रियांना अपत्य दत्तक घेण्याचा अधिकार दिला. स्त्रियांना संपत्ती बाळगण्याचा अधिकार देखील दिला. त्यामुळे, स्त्रियांचे जगणे सुसह्य झाले. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना देखील संपत्ती बाळगण्याचा अधिकार व अपत्य दत्तक घेण्याचा अधिकार प्रदान करण्याच्या कृतीतून त्यांचे स्त्री-पुरुष समानतेचे विचार दिसून येतात. माळवा प्रांताच्या उत्तर भागात अनेक गुंड दरोडेखोरांच्या टोळीने सर्वसामान्य जनतेला त्रास दिला होता अशांचाही त्यांनी बंदोबस्त केला. दक्षिण भागातील खानदेश व निमाड येथे भिल्लांनी व महेश्वर जवळील जाम घाटाच्या पठारावर गणपतराव मराठा नावाचा डाकू यांची दहशत होती. त्याच्या त्रासाला जनता त्रस्त झालेली होती. सर्वसामान्यांचे जीवन आनंदी करायचे असेल तर अशा विकृतीचा बिमोड करणे आवश्यक होते. अहिल्यादेवी यांनी घोषणा केली की "जो शूर माझ्या राज्यास चोर, डाकू यांच्यापासून मुक्त करेल त्याच्यासोबत माझ्या एकमात्र प्रिय कन्येचा विवाह करेल. "या प्रसंगी अहिल्यादेवी यांनी विवाहासंबंधित सामाजिक रुढी व परंपरा यांना नाकारुन व्यक्तीच्या केवळ गुणावरुन परिक्षण केले. जात, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश यावरून भेदभाव न करता सर्व व्यक्ती समान असल्याचा अमूल्य संदेश दिला. व्यक्तीचे परिक्षण जन्मावरुन नाही तर गुणांवरुन करावे, हे त्यांना सांगावयाचे होते. भारताचे संविधान देखील सर्व लोकांना समान मानते. समाजात समता प्रस्थापित करणे हे संविधानाचे उदिष्ट आहे. बंधुताअहिल्यादेवी यांच्या राज्यात हिंदू-मुस्लिम एकमेकांसोबत प्रेमाने वागत असत. मुसलमान शासकांनी भारतातील अनेक मंदिरे नष्ट केली. परंतु, अहिल्यादेवींनी त्यांच्या राज्यातील मुस्लिमांना कधीही त्रास दिला नाही. त्यांनी अनेक फकिर व मौलवींना जमीन, घर व सनद देऊन मदत केली. अहिल्यादेवी यांच्या कल्याणकारी राजव्यवहाराची किर्ती दूरपर्यंत पोहचली होती. हैदराबाद येथील निजामाच्या राज्यातील मुस्लिमांनी त्यांच्या राज्यात स्थायिक होण्याचा विचार केला असता अहिल्यादेवींनी त्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा देऊन राज्यात स्थायिक केले. माळवा प्रांतात मंदिरातील आरती व मस्जिद मधील नमाज यांचा आवाज सोबतच यायचा. त्यांच्या राज्यात हिंदू व मुस्लिम गुण्यागोविंदाने नांदत असत. त्यांच्यात कधीही भांडण तंटा होत नसे. त्यामुळे, त्यांच्यामध्ये एकमेकांविषयी बंधुभावाची भावना बळकट झाली होती व सामाजिक एकोपा निर्माण झाला होता. बंधुता हे भारताच्या संविधानातील मूलभूत मूल्ये आहे. बंधुतेशिवाय लोक एकमेकांशी प्रेमाने,सन्मानाने व शांततेने वागू शकत नाही. राष्ट्रीय भावना विकसित होण्यासाठी बंधुता महत्वाची आहे.सामाजिक न्यायअहिल्यादेवी न्यायप्रिय व्यक्ती होत्या. त्यांच्या राज्यात नियमानुसार चालणाऱ्या न्यायालयांची सुरुवात झाली. त्यांनी अनेक न्यायालयांची निर्मीती केली व न्यायधिशांची नियुक्ती केली. त्यामुळे, लोकांना सहज न्याय मिळू लागला. सर्व गावात पंचायत मंडळे स्थापन करुन न्यायाच्या कामाला गती देण्यात आली. पंचायत व न्यायालय यांच्या सर्व न्याय-निवाड्याचे विवरणपत्र राज्यातील उच्च अधिकारी व अहिल्यादेवी यांच्याकडे जात असे. पंचायत व न्यायालयात ज्यांचे समाधान होत नसे असे लोक अहिल्यादेवी यांच्याकडे न्याय मागत असे. अहिल्यादेवी यांची योग्य न्याय देण्याची किर्ती सगळीकडे पसरली होती. अशाप्रकारे त्यांच्या राज्यात चोख न्यायव्यवस्था अस्तित्वात होती. भारताच्या नागरिकांना योग्य, सहज व जलद न्याय मिळावा यासाठी संविधानाच्या भाग पाच - कलम १२४ ते १४७ मध्ये न्यायालयीन व्यवस्थेविषयी माहिती दिली आहे. भारताच्या प्रत्येक नागरिकास सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय मिळावा असे संविधानास अभिप्रेत आहे.लोक-कल्याणकारी राज्यअहिल्यादेवी यांचे राज्य आदर्श राज्य होते. त्यांनी आयुष्यभर लोककल्याणाची कामे केली. त्यांच्या राज्यात लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षितता या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्या होत्या. त्यांच्या राज्यात समाजातील सर्व घटकांचा आत्मसन्मान जपला जाईल याची खात्री होती. त्यांच्या राज्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, शांतता, न्याय ह्या सर्व गोष्टी अस्तित्वात होत्या. रामराज्य व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात लोक ज्याप्रमाणे आनंदी व शांततामय जीवन जगत होते तसेच जीवन ते अहिल्यादेवी यांच्या राज्यात जगत होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोक त्यांना हयातीतच पुण्यश्लोक, देवी, लोकमाता इत्यादी उपाध्या देऊ लागले होते. संविधानाच्या भाग चार - कलम ३६ ते कलम ५१ मध्ये राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. यामध्ये राज्याने लोकहिताची कामे करावीत असे सांगितले आहे. लोककल्याणकारी राज्य निर्माण करणे हे संविधानाचे उदिष्ट आहे.राष्ट्रनिर्माणाचे कार्यसर्वसाधारणपणे राजा आपल्याच राज्याच्या सीमा क्षेत्रात काम करत असे. अहिल्यादेवी यांनी त्यांच्या राज्याच्या सीमा क्षेत्राबाहेर अनेक ठिकाणी मंदीरे, घाट, विहीरी, धर्मशाळा, पाणपोया बांधल्या. बनारस ते कोलकाता हा रस्ता बांधल्याने लोकांची सोय झाली. आपल्या राज्याबाहेर लोकहिताची कामे करणाऱ्या त्या एकमेव आहेत. हे त्यांचे गुणवैशिष्ट्य अद्वितीय आहे. भारताच्या सर्व दिशांना बद्रिनाथ ते बनारस व सोमनाथ ते रामेश्वर अशी कामे करुन धार्मिक व सामाजिक कामांच्या माध्यमातून भारत एकसंघ जोडण्याचे काम केले. लोकांमध्ये एकात्मिक भावना विकसित झाली. त्यांनी धार्मिक, एकात्मिक व राष्ट्रीय या सुप्त भावनांना जागृत करुन राष्ट्रनिर्माणाचे कार्य केले. भारताच्या संविधानात दिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही नितीमूल्ये अहिल्यादेवी यांच्या राज्यात होती. तसेच त्यांचे राज्य लोक-कल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जात असे.भारतीय संविधानाला अशाच राज्याची अपेक्षा आहे. भारताचे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय नागरिकांनी अंगीकृत केले आहे. देशाचा विकास होण्यासाठी संविधानातील मुल्ये जनमानसात रुजणे आवश्यक आहे. मात्र संविधानातील मुल्ये आपल्या जनमानसात रुजलेली दिसत नाहीत. अहिल्यादेवी यांनी तत्कालीन काळात आपल्या कल्याणकारी राज्यकारभारातून समाज हिताला प्राधान्य दिले होते. अनेक राज्यकर्त्यांना त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. राजघराणे श्रीमंत होण्यापेक्षा गोरगरिबाचे जीवनमान उंचावणे हे अहिल्याबाईसाठी महत्वपूर्ण कार्य होते. आपल्या कल्याणकारी कार्यातून त्यांनी समाजासमोर नवा आदर्श निर्माण केला होता जो आजही आपल्या सर्वांसाठी दीपस्तंभ आहे. दि. ३१ मे २०२५ रोजी अहिल्यादेवी यांची ३०० वी जयंती आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त प्रत्येक नागरिकाने संविधानातील मूल्यानुसार वागण्याचा संकल्प करुया.

**श्री.संतोष धारे**
**सांख्यिकीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.**
**संपर्क : ७०८३४८२६४५**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002